
लोकमत पा.नं. II

# विरारमध्ये व्यापाऱ्यावर प्राणघातक हल्ला



विरारमध्ये व्यापाऱ्याच्या कारची तोडफोड करत जीवघेणा हल्ला केला.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** क्षुल्लक कारणावरून एका व्यापाऱ्यावर प्राणघातक हल्ला करून त्यांच्या गाडीची तोडफोड केल्याची घटना विरारमध्ये रविवारी घडली आहे. याप्रकरणी विरार पोलिसांनी गुन्हा दाखल करून हल्लेखोरांना अटक केली आहे.

व्यापारी निमेश शाह आपल्या कारमधून जात असताना विरार पूर्वेकडील पाचपायरी परिसरात त्यांच्या कारपुढे जात असलेल्या दुचाकीस्वाराच्याच चुकीमुळे कारने हलकीशी धडक दिली. त्यावरून संतापलेल्या दुचाकीस्वाराने शाह यांना शिवीगाळ केली. त्याकडे दुर्लक्ष करत शाह निघून गेले असता अचानक दुचाकीस्वार आपल्या साथीदारांसह आला आणि त्यांची कार अडवली. काही कळायच्या आतच हल्लेखोरांनी लोखंडी रॉडने कारवर हल्ला करत कारची नासधूस केली.

शाह कारमध्ये असल्याने त्यांना गंभीर इजा झाली नाही, पण गाडीचे मोठे नुकसान झाले आहे. हल्लेखोर कारची चावी घेऊन पळून गेल्याने शाह गाडीतच अडकून पडले होते. याप्रकरणी विरार पोलिसांनी गुन्हा दाखल करून हल्लेखोरांना अटक केली आहे. दिवसाढवळ्या झालेल्या हल्ल्याने व्यापाऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे.

पुण्यनगरी ५-५१-१.

# विकास आराखड्याविरोधात भाजपचा महापालिकेवर मोर्चा

**। मीरा रोड** : मीरा-भाईंदर शहराचा बनवण्यात आलेल्या सदोष प्रारूप विकास आराखड्याविरोधात भाजपचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेवर मोर्चा काढण्यात आला. महापालिका आयुक्त व प्रशासक दिलीप ढोले यांची शिष्टमंडळाच्या माध्यमातून भेट घेऊन निषेध व्यक्त केला व प्रारूप विकास आराखडा रद्द करून नवीन विकास आराखडा प्रस्तावित करण्याबाबत निवेदन दिले. त्यावर आयुक्तांनी त्यांच्या मागण्या राज्य सरकार व संबंधित अधिकाऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिले.



मीरा-भाईंदर शहराचा विकास आराखडा २०१७ रोजी संपुष्टात आला असून त्यानंतर लगेच विकास आराखडा प्रसिद्ध होणे आवश्यक होते. आता २०२२ ला प्रारूप विकास आराखडा प्रसिद्ध करण्यात आला आहे. नव्याने प्रसिद्ध झालेल्या विकास आराखड्यात देखील अनेक त्रुटी आहेत. या त्रुटी विरोधात सोमवारी भाजपचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्या नेतृत्वाखाली भाईंदर पश्चिमेतील बावन जिनालय अहिंसा चौकातून महापालिका मुख्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी मेहता म्हणाले की, शहराचा प्रस्तावित नवीन विकास आराखडा लोकाभिमुख नसून त्यात अनेक त्रुटी आहेत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यापर्यंत व राज्य प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आम्हाला आंदोलन करावे लागले. हा नवीन विकास आराखडा येत्या २० वर्षांचा विचार करून तयार केलेला नाही. प्रस्तावित प्रारूप विकास आरखाड्यामध्ये ग्रामपंचायत काळापासून असलेल्या जून्या रहिवासी इमारती, झोपड्या इत्यादी आरक्षणामध्ये बाधित होत आहेत. त्यामुळे त्यांचा पुनर्विकास होणार नाही हजारो नागरिक बेघर होतील. तसेच शहरात अस्तित्वात असलेले रस्ते दाखवलेले नाहीत, नागरिकंचा विरोध असलेले उत्तन व भाईंदर पश्चिम येथील कत्तलखान्याचे आरक्षण रद्द केले नाही. या नवीन प्रस्तावित विकास आराखड्यात रेल्वे परिसरात रेल्वे प्रवाशांसाठी रिक्षा स्टॅण्ड, बस टर्मिनल, आपत्कालीन व्यवस्था यासाठी कोणतेही नियोजन केलेले दिसून येत नाही. वाढत्या लोकसंख्याप्रमाणे उद्याने, मैदाने, वैद्यकीय सुविधा, पशू-पक्ष्यांसाठी पशुवैद्यकीय सुविधा, हॉस्पिटल, कॉलेज, पोलीस स्टेशन, भाजी मंडई, आयटी एअर ॲम्ब्युलन्सचे आरक्षण नसल्याने शहर मागे जाईल. जुन्या विकास आराखड्यातील आरक्षित शाळा, कॉलेज गार्डन मैदान आणि महापालिकेची प्रस्तावित इमारत हटवून त्या जागेला आर झोनमध्ये रूपांतरित केल्याचे मेहता यांनी म्हटले आहे. त्यामुळे कोणाच्या तरी आर्थिक फायद्याच्या उद्देशाने हे कृत्य करण्यात आल्याचा मेहता यांनी प्रश्न उपस्थित केला आहे.

पुण्यनगरी पा.नं.२.

# मविआच्या १७ डिसेंबरच्या मोर्चाला चळवळीतील विविध संघटनांचा पाठिंबा

मुंबई : महाराष्ट्राचा व येथील महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांच्या विरोधात महाविकास आघाडीच्या माध्यमातून येत्या १७ डिसेंबरला मुंबईत जिजामाता उद्यान (राणीबाग) ते आझाद मैदानापर्यंत निघणाऱ्या महामोर्चाला पाठिंबा देण्याचा निर्णय चळवळीतील, विविध सामाजिक संघटनांच्या कार्यकर्त्यांनी घेतला आहे.

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्यांची मालिका सुरूच आहे. या महापुरुषांबाबत जे बोलले जाते ते भयानक आहे. राज्यपालांची छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दलची वक्तव्ये आणि आता महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भीक मागून शाळा सुरू केल्या हे महाराष्ट्रातील एका जबाबदार मंत्र्याचे वक्तव्यही निषेधार्ह आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी कर्नाटकचे मुख्यमंत्री बेताल विधाने करून महाराष्ट्रातील जनतेच्या भावना दुखावत आहेत, तर लोकसभाध्यक्ष हा दोन राज्यांचा प्रश्न आहे असे बोलून महाराष्ट्रातील जनतेच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. या साऱ्या प्रवृत्तींच्या विरोधात निघणाऱ्या महामोर्चात सामील होत असल्याचे मुंबईतील विविध सामाजिक संस्था, संघटना आणि जनआंदोलनाच्या कार्यकर्त्यांनी म्हटले आहे.

तुषार गांधी, विद्या चव्हाण, शरद कदम, विशाल हिवाळे, संतोष आंबेकर, डॉ. विवेक कोरडे, नुरूद्दीन नाईक, मधू मोहिते, उमेश कदम, डॉ. संजय मंगला गोपाळ, रवी भिलाणे, एफ.एम. ठाकूर, सुधीर देसाई, केतन शहा, जगदीश नलावडे, प्रा. अरविंद निगळे, दुर्गा गुडीलू, प्रकाश हिवाळे, फरीदभाई शेख, बाळराज शेळके, एम.ए. खालिद, संजय कोकरे, प्रफुल्लभाई शेंडे, डॉ. सलीम खान, शाकीर शेख, उल्हास राठोड, मोहिनी अणावकर, ज्योती बडेकर, नंदकिशोर तळाशिलकर, मधू बिरमोळे, सिरत सातपुते, डॉ. प्रदीप जावळे, भीमराव गवळी, राहुलभाई सोळंकी, सम्राटभाई संगारे, संजयमामा शिंदे, बाळाभाऊ चव्हाण, किशोर कर्डक, डॉ. दीपक गायकवाड, मेलविल घोन्सालवीस, प्रफुल्ल वाघोले, मंगेश आवळे, देवयानी बेंद्रे, नितीन वाळके, विश्वास भोईर, विजय गोरे, निसार अली सय्यद, अर्चना ताजणे, सुजित पगारे, सचिन कांबळे, सुरज भोईर, शहाजी पाटोदेकर, वॉल्टर डिसोजा, कैलास सरकटे, राम कोंढाळकर, अर्चना तांबे, मनोज खराडे, अशोक शिंदे, संदेश बल्लाळ, संदेश बालगुडे, शमशाद तुर्की, अर्चना गजभिये, राजेश जाधव, हिरामण खंडागळे, विजय गोडबोले आदी कार्यकर्त्यांनी महामोर्चात सामील होण्याची माहिती देताना इतर नागरिकांनाही यामध्ये सामील होण्याचे आवाहन केले आहे.

पुढारी पु.पा.३.

# स्मशानभूमी, दफनभूमीचे आरक्षण मंजूर विकास आराखड्यातील समावेशासाठी प्रस्ताव सादर करा

## मुख्यमंत्र्यांचे पालिका आयुक्तांना निर्देश

**भाईंदर : राजू काळे**

मिरा-भाईंदर महापालिकेने सर्व धर्मीय स्मशानभूमी व दफनभूमीचे आरक्षण उत्तन तसेच नवघर येथे प्रस्तावित करण्यासाठी मंजूर विकास आराखड्यात त्याचा समावेश करावा. त्याकरिता राज्य शासनाला प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालिका आयुक्त दिलीप ढोले यांना नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत दिले आहेत.

पालिकेच्या १९९७ मधील शहर विकास आराखड्यांतर्गत भाईंदर पूर्वेच्या मौजे नवघर येथील सर्वे क्रमांक २४७ वर मुस्लिम समाजाच्या दफनभूमीचे आरक्षण टाकण्यात आले आहे. याठिकाणी दफनभूमी सुरू करण्यास स्थानिक ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविल्याने पालिकेने येथील प्रस्तावित दफनभूमीऐवजी सर्वधर्मीय अंत्यविधी केंद्र घोडबंदर किल्ल्याजवळील महसुल विभागाच्या जागेत सुरू करण्याची मागणी २०२० मध्ये आ. प्रताप सरनाईक यांनी तत्कालीन पालिका आयुक्त बालाजी खतगावकर यांच्याकडे केली. त्याचवेळी नवघर येथील दफनभूमीला शिवसेनेने विरोध दर्शविला तर काही ग्रामस्थांनी थेट मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनाच साकडे घातल्याने दफनभूमीच्या विकासाला राजकीय रंग येऊ लागला.

नवघर परिसरात मोठ्याप्रमाणात हिंदू लोकसंख्या असुन प्रभाग क्रमांक ३ मधील आरएनपी पार्क परिसरात मुस्लिम समाज मोठ्याप्रमाणात आहे. त्यामुळे येथील एका मोकळ्या भूखंडावर दफनभूमीची सोय पालिकेने उपलब्ध करुन द्यावी, अशी मागणी मुस्लिम समाजाने केली होती. त्याला ग्रामस्थांचा होणारा विरोध पाहता अखेर शहर विकास आराखड्यातील आरक्षणानुसार नवघर येथील आरक्षण क्रमांक २४७ वर दफनभूमीचा विकास करण्याचा ठराव सत्ताधारी भाजपाने बहुमताने मंजुर केला. हि आरक्षित जागा महसुल विभागाची असल्याने पालिकेच्या मागणीनुसार तसेच तत्कालीन महासभेत मंजूर झालेल्या ठरावानुसार तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ती जागा पालिकेकडे विकासाकरीता हस्तांतरीत केली. दरम्यान येथील दफनभूमीला स्थानिक ग्रामस्थांचा वाढता विरोध लक्षात घेता तसेच दफनभूमीची जागा कांदळवनाने बाधित होत असल्याने तीचा विकास पर्यावरणवादी धोरणात अडकण्याची शक्यता बळावली. यावर सरनाईक यांनी पालिकेने नवघर ऐवजी घोडबंदर किल्ल्याजवळ असलेल्या जागेत सर्वधर्मीय अंत्यविधी केंद्र सुरु करावे, अशी मागणी केली.

हि जागा महसुल विभागाची असुन त्या जागेवर अंत्यविधी केंद्र सुरू करण्यासाठी पालिकेने महसुल विभागाकडे मागणी करावी. तसेच घोडबंदर किल्ल्याच्या खालील बाजुस असलेल्या स्मशानभूमीलगत ती जागा असल्याने त्याचा अडसर कोणालाही होणार नसल्याचा दावा सरनाईक यांनी त्यावेळी केला. महसुल विभागाची एकूण १४ एकर जागा असुन त्यापैकी ९ एकर जागेत शिवसृष्टी साकारणार आहे. तर उर्वरीत ५ एकर जागेत अंत्यविधी केंद्र सुरु करता येणे शक्य असल्याचा दावा करीत त्याचे सादरीकरण देखील करण्यात आले. त्याला देखील घोडबंदरच्या ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविल्याने शेवटी सर्व धर्मीय स्मशानभूमी व दफनभूमीसाठी उत्तन येथील सर्वे क्रमांक ३५२अ वरील ९९ हेक्टर जागेपैकी ५ हेक्टर हि शासकीय जागा उपलब्ध करून देण्याची मागणी पालिकेने राज्य शासनाकडे केली.

### पालिकेला आरक्षणात फेरबदल करावा लागणार

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत उत्तन येथील सर्वे क्रमांक ३५२अ वरील ५ हेक्टर जागेसह नवघर येथील सर्वे क्रमांक २४७ वरील शासकीय जागेत सर्व धर्मीय स्मशानभूमी व दफनभूमीचा विकास करण्यासाठी त्याचे आरक्षण मंजूर विकास आराखड्यात समाविष्ट करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत पालिका आयुक्तांना दिले. मात्र तत्पूर्वी पालिकेला या दोन्ही जागांवर असलेल्या आरक्षणात फेरबदल करण्याचा ठराव प्रशासकीय बैठकीत मजूर करावा लागणार असून तद्नंतरच मंजूर विकास आराखड्यात त्या आरक्षण समावेशाचा प्रस्ताव शासनाला मान्यतेसाठी सादर करावा लागणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

लोकसत्ता ५.५.१७.

# वाहनातील विनयभंग प्रकरणातील गूढ कायम

## पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून शोध सुरू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** चालत्या वाहनातून महिलेचा विनयभंग आणि तिच्या मुलीच्या मृत्यूप्रकरणी पोलिसांनी ४ जणांविरोधात हत्या आणि विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. महिला वाहनात बसून अपघात होण्याचा काळ केवळ ३ मिनिटांचा होता. मग या ३ मिनिटांत नेमके काय घडले? महिलेचा विनयभंग सर्वच प्रवाशांनी एकाच वेळी कसा केला? याचा शोध गुन्हे शाखेचे पोलीस करत आहेत.

वाडा येथे राहणारी २० वर्षीय महिला शनिवारी सकाळी पेल्हार येथून वाड्याला घरी जाण्यासाठी निघाली होती. तिच्या सोबत तिची १० महिन्यांची मुलगी होती. तिने पेल्हार येथून खासगी इको गाडी पकडली. ती मुलीसह चालकाच्या शेजारील आसनावर बसली होती. या वाहनात चालक आणि अन्य ५ प्रवासी होते.

वाहन काही अंतर पुढे जाताच तिची मुलगी खिडकीतून खाली पडली आणि पाठोपाठ या महिलेने उडी मारली. या प्रकारात चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला होता. वाहनातील चालक आणि प्रवाशांनी माझा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला म्हणून स्वतःला वाचविण्यात ही घटना घडली असा खळबळजनक आरोप या महिलेने केला. तिच्या तक्रारीनुसार मांडवी पोलीस ठाण्यात चालक आणि तीन प्रवाशांविरोधात हत्या आणि विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला. या प्रकरणाचे गांभीर्य पाहून हा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.

### 'त्या' तीन मिनिटांत नेमके काय घडले?



वाहनात नेमका विनयभंग कसा झाला? मुलगी गाडीतून पडली की तिला फेकले? याचा पोलीस तपास करत आहेत. पेल्हार फाट्यावरून महिला वाहनात बसली. तेथून घटनास्थळ केवळ १.८ किलोमीटर एवढे आहे. म्हणजे जास्तीत जास्त तीन मिनिटांचा वेळ लागला. या काळात महिलेने नवऱ्याला फोन करण्यासाठी चालकाचा फोन घेतला. तो लागला नाही म्हणून चालकालाच फोन लावून द्यायला सांगितले. याच वेळेस तिची मुलगी पडली. मग या तीन मिनिटांत नेमका विनयभंग कसा झाला? चालकाने विनयभंग केला तर मागच्या आसनावर बसलेल्या तीन प्रवाशांनी कसा विनयभंग केला? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. पोलिसांनी अटक केलेला चालक विनय कुशवाह ६० वर्षांचा असून त्यानेच महिलेला आणि तिच्या मुलीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आणि शेवटपर्यंत तो सोबत होता. अन्य ५ प्रवासी नंतर इतर वाहनातून निघून गेले. यापैकी एका प्रवाशाला पोलिसांनी शोधले असून तो चादर विक्रेता आहे. तो सर्वात मागच्या आसनावर बसला होता. अन्य तीन प्रवाशांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

लोकसत्ता ५.५.१७.

# किनाऱ्यावर ५७ हजारांच्या रद्द झालेल्या नोटा आढळल्या

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**विरार :** वसईच्या सुमुद्र किनारी साफसफाई करणाऱ्या एका दाम्पत्याला नोटाबंदीच्या काळात रद्द झालेल्या १००० आणि ५०० च्या नोटा सापडल्या आहेत. यात एकूण ५७ हजारांच्या नोटा सापडल्या असून त्यांनी त्या पोलिसांच्या स्वाधीन केल्या आहेत.

वसई भुईगाव येथे राहणारे लिसबोन फेरेरा हे पत्नीसह अनेक वर्षांपासून आवड म्हणून सागरी किनाऱ्याची दर रविवारी आपल्या कामातून वेळ काढून साफसफाई करत असतात. असेच रविवारी ते साफसफाई करत असताना त्यांना भुईगाव सागरी किनाऱ्यावर कचऱ्यात एक जुनी रद्द झालेली ५०० रुपयांची नोट आढळून आली. त्यांनी आणि त्यांच्या पत्नीने इतर ठिकाणी शोध घेतला असता त्यांना १००० रुपयांची नोट दिसली, मग त्यांनी या परिसरात शोध सुरू केला असता त्यांना तब्बल ५७ हजार रुपयांच्या नोटा आढळून आल्या. त्यांनी त्या जमा करून वसई पोलिसांच्या ताब्यात दिल्या. या बंद झालेल्या नोटा या ठिकाणी कशा आल्या, कुणी टाकल्या की समुद्रातून वाहून आल्या, याचा शोध वसई पोलीस घेत आहेत.

लोकसत्ता ५-५-१.

# आठ महिन्यांत केवळ ९१ अवैध प्रवासी वाहनांवर कारवाई

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** वसई विरार शहरात आठ महिन्यात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या केवळ ९१ वाहनांवर उपप्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई केली आहे. त्यातून सुमारे ३ लाख ३२ हजार रुपये इतका दंड वसूल केला आहे.

सध्या खासगी वाहतूकदार मनमानी पद्धतीने कारभार करताना दिसून येत आहे. शहरी भागासह ग्रामीण भागात अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू आहे. वाहनाच्या क्षमतेपेक्षा प्रवाशांची संख्या अधिक झाल्याने अनेकदा अपघाताच्या घटना समोर येत आहेत.

या समस्येला आवर घालण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन विभाग वसई यांच्या मार्फत कारवाई करण्यात येत असल्याचे परिवहन विभागाने सांगितले आहे.

एप्रिल ते नोव्हेंबर या आठ महिन्याच्या कालावधी मध्ये वसई विरार विभागात ३४५ वाहनांची तपासणी करण्यात आली आहे. त्यामध्ये ९१ वाहने अवैध प्रवासी करताना आढळून आली आहेत. त्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून ३ लाख ३२ हजार ४००रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. याशिवाय २६ वाहनांची अनुज्ञाप्ती निलंबन तर १३ वाहनांची नोंदणी निलंबन करण्यात आली असल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन विभागाने दिली आहे..

मुंबई

लोकसत्ता ५-५-१.

# महामार्गावर बेकायदा प्रवासी वाहतूक

## 'परिवहन'च्या दुर्लक्षामुळे प्रवाशांच्या जिवाशी खेळ

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** वसई-विरार पूर्वेला मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर बेकायदा खासगी प्रवासी वाहतूक सुरू आहे. विनापरवाना वाहतूक प्रवाशांच्या जिवाशी खेळ असल्याने त्याविरोधात तातडीने कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

चिंचोटी ते मनोर दरम्यान चारचाकी वाहनांमधून बेकायदा प्रवासी वाहतूक सुरू आहे. सायंकाळी या वाहनांची संख्या अधिक असते. पेल्हारजवळील नोवेल्टी हॉटेलसमोर खासगी वाहनातील वाहनचालक आणि प्रवाशांनी महिलेचा विनयभंगाचा प्रयत्न केल्याचा प्रकार घडला होता. या घटनेत महिलेने तिच्या मुलीसह धावत्या गाडीतून उडी मारली. यात दहा महिन्यांच्या बालिकेचा मृत्यू झाला होता, तर महिला जखमी झाली होती.

प्रवासी वाहतुकीसाठी उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून अधिकृत परवाना दिला जातो. पिवळ्या आणि काळ्या रंगाची वाहनेच परवानाधारी आहेत. तरीही खासगी वाहतूक करणारी चारचाकी वाहने वाहतुकीसाठी वापरली जात आहेत. अशा वाहनांच्या संख्येत वाढ होत आहे. रोज सकाळी आणि सायंकाळी महामार्गावर बेकायदा प्रवासी वाहनांची वर्दळ सुरू आहे. तरीही परिवहन विभाग या प्रकाराकडे दुर्लक्ष करीत आहे. काही वेळा क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेऊन प्रवास केला जात आहे.

### माहितीचा अभाव

रिक्षाचालकांनी त्यांच्याविषयीची संपूर्ण माहिती रिक्षाचालक बसत असलेल्या मागील बाजूस लावणे बंधनकारक आहे. रिक्षाचालकाचे नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि रिक्षा क्रमांक अशी सर्व माहिती प्रवाशांना मिळू शकते. मात्र विनापरवाना असलेल्या खासगी वाहनात कोणतीही माहिती नसते. त्यामुळे एखादी दुर्दैवी घटना, अपघात आणि विनयभंगाचे प्रकार घडल्यास प्रवाशांना वाहनांची ओळख त्याची माहिती मिळण्यास अडचणी निर्माण होत असतात.

> **"महामार्गावर खासगी वाहनांतून जे प्रवासी वाहतूक करीत आहेत त्या वाहनचालकांवर कारवाई सुरूच असते. आता पुन्हा एकदा ही मोहीम तीव्र करून विनापरवाना प्रवासी वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल.** - प्रवीण बागडे, सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी

शहरबात

**नीरज राऊत**

# महामार्गावर प्राणांपेक्षा पैसा प्रिय...

मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग हा काही निवडक ठिकाणी वगळता सहा पदरी झाला असल्याने गाड्यांचा वेग वाढला आहे. परिणामी या महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत. त्यात गंभीर जखमी झालेल्या रुग्णांवर उपचाराची व्यवस्था व कार्यपद्धती नसल्याने प्रसंगी रुग्णांना प्राण गमवावे लागले आहेत. या महामार्गावरील पथकर वसुली होत असली तरी वैद्यकीय सोयीसुविधा जवळपास नसल्यात जमा आहेत.

**खाजगी व** प्रवासी वाहतूक, माल वाहतूक, रासायनिक वाहतूक व इतर वाहनांची वर्दळ असणाऱ्या या राष्ट्रीय महामार्गावर दहिसर ते तलासरी दरम्यानच्या राज्यातील पट्ट्यामध्ये नियमितपणे अपघात होत असतात. वसई-विरार परिसरापर्यंत अपघात घडल्यास त्या ठिकाणी खाजगी रुग्णालयांची उपलब्धता असल्याने त्या ठिकाणी उपचार मिळण्याची व्यवस्था आहे. शिवाय रुग्ण गंभीर असल्यास त्यांना पुढील उपचारासाठी मुंबईकडे पाठवण्यात येते.

वसई तालुक्याच्या तुलनेत पालघर, डहाणू व तलासरी तालुक्यात अपघात घडण्याची संख्या अधिक असून या ठिकाणी वैद्यकीय सुविधांची वानवा आहे. अनेक वर्षांपासून मागणी होत असलेल्या ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याचे काम अजूनही प्रलंबित राहिले आहे. राष्ट्रीय महामार्गावर मनोर टाकवहाळ येथे २२० खाटांचे ट्रॉमा सेंटर उभारण्याचे काम ७५ टक्के पूर्ण झाले असून या रुग्णालयाच्या उर्वरित कामासाठी लागणाऱ्या निधीची उपलब्धता व कामाची पूर्तता होण्यास किमान आठ- नऊ महिन्यांचा अवधी लागणे अपेक्षित आहे. पालघर नंडोरे येथे जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्यासाठी निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून या कामाला नवीन वर्षात



## धक्का शोषक यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**सायरस मिस्त्री यांच्या वाहनाला अपघात झालेल्या ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने धक्का शोषक करणारी यंत्रणा कार्यरत असली तरीही अतिवेगाच्या वाहन एअरबॅग असणाऱ्या वाहनांना अपघात घडल्यास कोणती यंत्रणा अधिक प्रभावी ठरेल याबाबत वेगवेगळे मतप्रवाह पुढे येत आहेत. राष्ट्रीय महामार्गावर प्रवास करताना अनेकदा वाहनातील प्रवासी सीट बेल्ट घालत नसल्याने अपघाताच्या धक्क्याने वाहनातील अडकला किंवा वाहनाच्या बाजूला आदळून गंभीर जखमी होत असल्याचे दिसून आले आहे. मात्र अलीकडच्या काळात अनेकदा एअर बॅग उघडली जात असल्याचे धक्का शोषक यंत्रणेमुळे त्या ठिकाणी अपघात घडल्यास एअर बॅग उघडतील किंवा नाही याबद्दल शंका उपस्थित करण्यात येत आहे**

आरंभ होऊन रुग्णालयाच्या उभारणीसाठी तीन वर्षांचा कालावधी लागणे अपेक्षित आहे.

कासा येथे असणाऱ्या उपजिल्हा रुग्णालयाला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ट्रॉमा केअर सेंटर म्हणून संबोधित केले होते. मात्र त्या ठिकाणी गंभीर रुग्णांवर उपचार करण्यासाठी तज्ज्ञ मनुष्यबळ, सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने टोलवसुलीच्या ठेक्यातील अटी- शर्तींची पूर्तता करण्यापुरता कागदोपत्री केंद्र अशी त्या ठिकाणी अवस्था आहे.

पालघर व डहाणू तालुक्यातील महामार्गाच्या पट्ट्यात अपघात झाल्यास गंभीर रुग्णांना गुजरात राज्यातील वापी, वलसाड, केंद्रशासित प्रदेशातील सेलवास, दमण येथे हलविणे भाग पडते. उद्योगपती सायरस मिस्त्री यांच्या वाहनाला झालेल्या अपघातप्रसंगी गंभीर असणाऱ्या पंडोल कुटुंबीयांतील जखमींना अशाच पद्धतीने वैद्यकीय व्यवस्थापन करण्यात आले होते. मात्र अपघातामध्ये हाडांशी संबंधी ( ऑर्थोपेडिक ) किंवा मज्जातंतू ( न्यूरोलॉजी ) संदर्भात गुंतागुंत असल्यास अशा रुग्णांना गुजरात व केंद्रशासित प्रदेशातील जवळच्या ठिकाणी योग्य उपचार मिळत नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे अशा रुग्णांना सुरत किंवा अन्य ठिकाणी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली उपचारार्थ दाखल करणे गरजेचे भासत असून एका रुग्णालयातून दुसऱ्या रुग्णालयात रुग्ण स्थलांतरित केला जाणारा किमती वेळ रुग्णांच्या भवितव्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत असतो. शिवाय गुजरात व केंद्रशासित प्रदेशांमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्या वाढल्याने महाराष्ट्रातून येणाऱ्या रुग्णांना पूर्वीइतके आदरातिथ्य मिळत नसल्याचे सांगण्यात येते. तसेच या सर्व ठिकाणी गंभीर रुग्णांना रक्ताची गरज भासल्यास रक्तदान करण्यासाठी व्यक्तीला सोबत न्यावे लागते अशी स्थिती आहे.

एकंदर परिस्थिती पाहता अपघातामध्ये गंभीर असणाऱ्या रुग्णांवर उपचार करण्याची सक्षम व्यवस्था नसल्याने जो पर्यंत नवीन ट्रॉमा केअर रुग्णालय पूर्ण क्षमतेने व मनुष्यबळाच्या ताकदीने कार्यरत होत नाही तोपर्यंत सोमटा ते चारोटी दरम्यान हंगामी मिनी ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची गरज भासत आहे. सोमटा येथे असणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रात आठ किंवा दहा खाटांच्या रुग्णालयासाठी आवश्यक जागा उपलब्ध असून प्राथमिक आरोग्य केंद्रातील मनुष्यबळाच्या जोडीला जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे असणाऱ्या तज्ज्ञांची जोड देणे शक्य आहे. त्याचबरोबर डहाणू परिसरात असणाऱ्या खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील सोयीसुविधा व मनुष्यबळाच्या मदतीने गंभीर रुग्णांना स्थिर करण्यासाठी अशा केंद्राची मदत होऊन अनेक गंभीर रुग्णांची होणारी फरफट थांबू शकेल व त्यांचे प्राण वाचू शकतील. अशी व्यवस्था उभारण्यासाठी लोकप्रतिनिधी यांचा पुढाकार आवश्यक आहे. टोल वसुली करणाऱ्या महामार्ग प्राधिकरणाच्या टोल वसुली ठेकेदारामार्फत अशी व्यवस्था कार्यरत ठेवण्यासाठी औषध व निधीची उपलब्धता करून देणे शक्य असून जिल्हा प्रशासनाने याबाबत गांभीर्याने विचार करणे गरजेचे झाले आहे.

मुंबई

म.टा. ५-५-२

# फेरीवाल्यांचा विळखा कायम

## वसई-विरारमध्ये रस्ते, पदपथ व्यापल्याने वाहतुकीला अडथळा



**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वसई-विरार महापालिका हद्दीत फेरीवाल्यांची समस्या जटील आहे. फेरीवाल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. तसेच रस्ते, पदपथावरही फेरीवाल्यांनी बस्तान मांडल्याने शहराचे सौंदर्य बिघडत आहे.

शहरात जागोजागी फेरीवाल्यांनी अतिक्रमण केले असून पदपथ, मुख्य रस्ते, गर्दीची ठिकाणे, मोकळ्या जागा यावर ठिय्या मांडला आहे. त्यामुळे चालणेही मुश्किल होत आहे. शिवाय वाहतूक कोंडीतही भर पडत आहे. विशेषतः नालासोपारा पूर्व रेल्वे स्थानक परिसर, तुळींज रस्ता, वसई रोड रेल्वे स्थानक परिसर, विरार रेल्वे स्थानक परिसर येथे फेरीवाल्यांची संख्या सर्वाधिक असून सायंकाळच्या वेळी फेरीवाल्यांमुळे वाहतुकीस सर्वाधिक अडथळा निर्माण होत आहे. अर्ध्याहून अधिक रस्ता फेरीवाल्यांनी व्यापल्याने वाहनचालकांना कोंडीचा सामना करावा लागत आहे. पालिकेकडून थातुरमातुर कारवाई करण्यात येते. मात्र फेरीवाले पुन्हा बस्तान मांडतात.

शहरात फेरीवाला धोरण निश्चित नसल्याने ही समस्या उद्भवत आहे. शहरामध्ये 'राष्ट्रीय फेरीवाला धोरण' लागू करावे, असे आदेश राज्य सरकारने २०१४मध्ये दिले होते. त्यासाठी सर्वप्रथम फेरीवाल्यांची नोंदणी करण्यासाठी त्यांचे सर्वेक्षण गरजेचे होते. त्यानुसार पालिकेने २०१७मध्ये बायोमेट्रिक पद्धतीने फेरीवाल्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले. यामध्ये १२ हजार ७६८ स्थिर फेरीवाले आणि दोन हजार ३८८ अस्थिर फेरीवाले यांची नोंद करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात शहरात १५ हजारांहून अधिक फेरीवाले असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे फेरीवाला धोरण लवकर लागू करण्याची गरज नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### नव्याने सर्वेक्षण

करोनानंतर फेरीवाल्यांच्या संख्येत भर पडत गेल्याचे निरीक्षण पालिकेने नोंदवले होते. त्यावर तोडगा काढण्यासाठी पालिकेने कारवाई सुरू केली आहे. मात्र कायमस्वरूपी तोडगा काढणे गरजेचे असल्याने पालिकेने नव्याने सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी पालिकेने ९० लाखांचे बजेट ठेवले असून प्रत्येक प्रभागासाठी १० लाखांची तरतूद आहे. त्यामध्ये सर्वेक्षण, ओळखपत्र यांसह इतर गोष्टींचा समावेश आहे. यासाठी पालिकेने निविदा प्रक्रिया राबवली असून हे सर्वेक्षण सुरू होण्याच्या अंतिम टप्प्यात असल्याचे पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले.

### ६ हजार फेरीवाल्यांना कर्जवाटप

वसई-विरार महापालिकेच्या 'राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान' विभागातर्फे दीनदयाळ अंत्योदय योजनेअंतर्गत पंतप्रधान स्वनिधीतून शहरातील फेरीवाल्यांना कर्जवाटप करण्यात येत आहे. या योजनेतून आतापर्यंत पालिकेने सहा हजार ४०० फेरीवाल्यांना कर्ज वितरित केले आहे. या योजनेअंतर्गत सुरुवातीला ७ टक्के इतक्या नाममात्र व्याजाने १० हजार रुपये कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासाठी पालिकेने २३ हजार फेरीवाल्यांचे फॉर्म भरून घेतले असून त्यामध्ये १३ हजार फेरीवाल्यांचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे, तर सद्यस्थितीत सहा हजार ४०० फेरीवाल्यांना कर्ज देण्यात आल्याची माहिती पालिकेने दिली.

मटा ऑन दी स्पॉट

## मिरा-भाईंदरमध्ये धोरणासाठी आणखी वर्षभराची प्रतीक्षा



**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीत केंद्र सरकारच्या आदेशानुसार फेरीवाला धोरण राबवण्याच्या दृष्टीने २०१७ साली सर्वेक्षणाला सुरुवात करण्यात आली. हे काम २०२१मध्ये पूर्ण झाल्यानंतर, फेरीवाल्यांची अंतिम यादी तयार करण्यात आली आहे. परंतु आता वास्तव्याच्या दाखल्याची अट शिथिल करण्यात आल्याने, या यादीत समाविष्ट नसलेल्या फेरीवाल्यांचे पालिकेकडून पुन्हा सर्वेक्षण केले जात आहे. त्यामुळे फेरीवाला धोरण निश्चित करण्यासाठी आणखी वर्षभराचा काळ लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मिरा-भाईंदर पालिकेने काही वर्षांपूर्वी केलेल्या सर्वेक्षणाअंती सात हजार २२१ फेरीवाल्यांची यादी तयार करण्यात आली आहे. परंतु सद्यस्थितीत फेरीवाल्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. शहरातील फेरीवाल्यांची संख्या १२ हजारांच्या वर गेल्याचे बोलले जात आहे.

### रहदारीचे मार्ग व्यापले

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील मुख्य रहदारीचे मार्ग हे फेरीवाल्यांनी व्यापले आहेत. रहदारी नसलेल्या मार्गांवर फेरीवाल्यांची संख्या तुरळक आहे. परिणामी नागरिकांना फेरीवाल्यांमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

### अंतिम यादीची प्रतीक्षा

मिरा-भाईंदर पालिकेने फेरीवाल्यांचे नव्याने सर्वेक्षण करत, अंतिम यादी तयार केल्यानंतर ती फेरीवाला समितीपुढे मंजुरीसाठी सादर केली जाणार आहे. त्यानंतर प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करत, त्यापुढील कार्यवाही केली जाणार आहे. त्यामुळे फेरीवाला धोरण निश्चित करण्यासाठी आणखी वर्षभराचा काळ लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### अधिकाऱ्यांवर हल्ले, हुज्जत

रस्त्यांवर बेकायदा व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाईसाठी गेलेल्या पालिकेच्या पथकांवर फेरीवाल्यांकडून हल्ले करण्यात आल्याच्या घटना मिरा-भाईंदरमध्ये घडल्या आहेत. या हल्लेखोर फेरीवाल्यांवर गुन्हेदेखील दाखल करण्यात आले आहेत. कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांशी हुज्जत घालणे, वादावादी करणे असे प्रकारही फेरीवाल्यांकडून केले जातात.

### फेरीवाले येतात कुठून?

मिरा-भाईंदरमध्ये हजारोंच्या संख्येने फेरीवाले व्यवसाय करत आहेत. यातील निम्म्यांहून अधिक फेरीवाले हे वसई-विरारसह मुंबईच्या विविध परिसरांमधून येतात. पालिकेने सर्वेक्षण करत फेरीवाल्यांची यादी तयार करताना घेतलेल्या कागदपत्रांतून ही माहिती समोर आली होती.

### वगळलेल्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण सुरू

| शहरातील फेरीवाल्यांची संख्या | |
|---|---|
| काही वर्षांपूर्वी केलेल्या सर्वेक्षणानुसार | ७,२२१ |
| प्रत्यक्ष संख्या (अंदाजे) | १२ हजारांवर |

### कायमस्वरूपी तोडगा गरजेचा

मिरा-भाईंदरमध्ये व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांची संख्या दिवसागणिक वाढत आहे. हे फेरीवाले रस्त्यांवर व्यवसाय करत असल्याने, त्यांच्यावर कारवाई केली जाते. परंतु, यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी अधिकृत फेरीवाल्यांची निश्चिती करणे, त्यांना जागा उपलब्ध करून देणे यांसाठी धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

### मंड्यांकडे पाठ

मिरा-भाईंदर शहराच्या विविध भागांमध्ये लाखो रुपये खर्च करून पालिकेने भाजी मंड्या उभारल्या आहेत. या भाजी मंड्यांमध्ये फेरीवाल्यांनी व्यवसाय करणे अपेक्षित आहे. मात्र, फेरीवाले या भाजी मंड्यांकडे पाठ फिरवून रस्त्यावरच व्यवसाय करण्यास प्राधान्य देत आहेत. परिणामी अनेक भाजी मंड्या धूळ खात पडून आहेत. फेरीवाल्यांना त्या ठिकाणी व्यवसाय करण्यासाठी पाठवण्याचे प्रयत्न करण्याकडे पालिकेकडून दुर्लक्ष केले जात आहे.

(संकलन व छायाचित्रे : वैष्णवी राऊत, भाविक पाटील, सचिन हळदे)